**पुणे विभागातील जिल्हा तांत्रिक सेवा व जिल्हा सेवा वर्ग-३ मधील कर्मचाऱ्यांच्या महाराष्ट्र विकास सेवा गट-ब मध्ये तदर्थ पदोन्नती.**

## महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग

**शासन आदेश क्रमांकः मविसे-१०/प्र.क्र.५५/२०१८/आस्था-३ (अ)**

मंत्रालय, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.

तारीख: ५ जुलै, २०१९.

संदर्भ :- शासन आदेश ग्रामविकास विभाग क्र.मविसे-१०/प्र.क्र.५५/२०१८/आस्था-३अ दि.३०.५.२०१९

शासन आदेश :-

उपरोक्त संदर्भिय शासन आदेशान्वये पुणे विभागातील जिल्हा तांत्रिक सेवा व जिल्हा सेवा वर्ग-३ मधील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र विकास सेवा गट-ब संवर्गात पीबी-२ वेतनश्रेणी रुपये ९३००-३४८००+ ग्रेड वेतन ४४०० या वेतनश्रेणीत तदर्थ स्वरुपात सरळसेवा कोटयातून पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदर आदेशान्वये श्री.अरविंद द. चव्हाण, विस्तार अधिकारी(आरोग्य), जिल्हा परिषद, सांगली यांना सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चंदगड जि.कोल्हापूर या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेली आहे. तथापि, सदर पदावर श्री.चव्हाण हजर झालेले नाहीत. श्री.चव्हाण यांनी त्यांच्या पत्नीच्या आजारपणास्तव व त्यांच्या सेवानिवृत्तीस ११ महीने कालावधी शिल्लक असल्याचे नमूद करुन पदस्थापनेत बदल करुन देण्याबाबत विनंती केली आहे. त्यामुळे श्री.चव्हाण यांना सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चंदगड जि.कोल्हापूर या ऐवजी सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कडेगांव जि.सांगली या रिक्त पदावर अंशत: बदल करुन पदस्थापना देण्यात येत आहे.

२. श्री.अरविंद द. चव्हाण यांनी पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. त्यांनी अनधिकृतपणे रजेवर जावू नये. तसेच, याबाबत उर्वरित अटी व शर्ती संदर्भांकित शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे असतील.

३. विभागीय आयुक्त पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी श्री.चव्हाण यांना पदस्थापनेच्या पदावर रुजू करुन घेऊन याबाबत शासनास अवगत करावे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201907051455493020 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA NATHA SAVANE

Digitally signed by RAJENDRA NATHA SAVANE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0a2ac5ab6ca0075cc776c90ec03925f2eb8727640eacf311beb6f68d63939303, postalCode=400032, street=MANTRALAYA , MUMBAI, serialNumber=f049989dbbef93340e9edd88af960a0963746d42baa5c948405b62e821529a99, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJENDRA NATHA SAVANE
Date: 2019.07.05 15:19:56 +05'30'

( रा.ना.सवने )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री ( ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
३) मा. प्रधन सचिव (ग्राम विकास व पंचायत राज).
४) विभागीय आयुक्त, पुणे.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर, सांगली.
६) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर, सांगली.
७) महालेखापाल- २ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
८) संबंधित अधिकारी (द्वारा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली).
९) निवड नस्ती.